**<u>प्रेस नोट</u>** **दि.३१/०८/२०१९**

पोलीस दलामध्ये प्रदिर्घ सेवा बजावून पोलीस दलामधून माहे ३१ ऑगस्ट-२०१९ रोजी सेवानिवृत्त होणारे ०२ पोलीस उप निरीक्षक व १३ पोलीस अमंलदार असे एकूण १५ पोलीस अधिकारी/अमंलदार यांचे सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दिनांक ३१/०८/२०१९ रोजी १०.३० वा. पोलीस आयुक्त कार्यालयाचे कॉप्स एक्सलन्स हॉल मध्ये मा.डॉ.के.व्यंकटेशम्,पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अध्यक्षतेखाली पार पडला.

मा.डॉ.के.व्यंकटेशम्,पोलीस आयुक्त यांनी सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी व अमंलदार यांना शाल, श्रीफळ व बोधचिन्ह देवून सन्मानित केले. सेवानिवृत्त होणारे पोलीस अधिकारी, अमंलदार व त्यांचे कुटूंबियांना मार्गदर्शन करताना मा.डॉ.के.व्यंकटेशम्,पोलीस आयुक्त यांनी **''आपण सेवानिवृत्त होताय, आमचा निरोप घेताय हे जरी खरे असले तरी तुमच्याशी असलेले आमचे नाते सदैव अबाधित राहिल.''** अशी भावना व्यक्त करुन सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सुखा-समाधानाचे व आरोग्यदायी जावो अशी मनोकामना व्यक्त केली.

सेवानिवृत्त होणा-या अमंलदारांपैकी सपोउनि श्री. चांदेकर यांचे वडील माजी सेवानिवृत्त सपोफौ श्री वसंतराव चांदेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना पोलीस दलातील आपले विविध अनुभव सांगितले व मुलाच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे भाग्य लाभल्याबद्दल व या क्षणांचे साक्षीदार होण्याची संधी दिल्याबद्दल पोलीस दलाचे आभार व्यक्त केले.

सेवानिवृत्त होणारे सपोउनि श्री.रमेश कदम यांनी तसेच सपोउनि श्री संपत भगत व त्यांचे मुलीने आपले मनोगत व्यक्त करुन पोलीस दलाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

सदर कार्यक्रमाला मा.पोलीस आयुक्त डॉ.के.व्यंकटेशम्, मा.सह पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र शिसवे, अपर पोलीस आयुक्त, प्रशासन डॉ.संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय श्री.विरेंद्र मिश्र, सहायक पोलीस आयुक्त श्री.चंद्रकांत सांगळे, श्री.मिलींद पाटील, श्री कल्याणराव विधाते, मंत्रालयीन कर्मचारी, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अमंलदार व त्यांचे कुटूंबिय हजर होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना श्री.विरेंद्र मिश्र, पोलीस उप-आयुक्त, मुख्यालय, आभार प्रदर्शन श्री.कल्याणराव विधाते,स.पो.आ.मा.सं.वि यांनी केले.

**(कल्याणराव विधाते)**
सहायक पोलीस आयुक्त,
मानव संसाधन विभाग, पुणे शहर.